जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि. अमरावती

वार्षिक अहवाल

२००९-१०

मुख्य कार्यालय : १ ला मजला, खत्री कॉम्प्लेक्स, वॉलकर्ट कम्पाउंड, अमरावती. फोन : २५६००५७, २५७००५६, २५६६१५६

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि. अमरावती

मुख्य कार्यालय : १ ला मजला, खत्री कॉम्प्लेक्स, वॉलकर्ट कम्पाउंड, अमरावती. फोन : २५६००५७, २५७००५६, २५६६१५६

संचालक मंडळ : २००६-२०११

१	इंजि.अविनाश अंबादासराव कोठाळे Chartered Engineer MIE, LL.B., ADIM, DMM	अध्यक्ष	२५४११२५, २५४०१८८
२	इंजि. राजेंद्र शंकरराव जाधव B. E. (Mech.)	उपाध्यक्ष	२५१०३५२, ९८२३०३५३८२
३	इंजि. अरविंद दत्तात्रय गावंडे B. E. (Civil.), DIT	संचालक	९४२३१२४६७१
४	इंजि. दिनकर जानरावजी भुगुल D.C.R.E.	संचालक	२६६११७७
५	इंजि. प्रदीप चतुरसिंग वानखडे B.E. (Civil), DBM	संचालक	९३७२७३७५४२
६	डॉ. अनिल सुस्थदेवराव बोंडे M.D (Medi.)	संचालक	९४२२१५६३३६
७	श्री एकनाथराव ज्ञानेश्वरराव मोहोड B.Com., D.C.B.M.	संचालक	२५१२२७८
८	श्री भाष्कररराव अमृतराव चौधरी M.Com.	संचालक	२६७०५१७
९	इंजि. सतिश रामदास काळमेघ B.E. (Comp.), MBA	संचालक	९४२२८५७०७१
१०	प्रा. अनिल मधुकरराव बंड M.Sc. (Agri.)	संचालक	९८२३११०३८२
११	डॉ. वसंतराव नामदेवराव लवणकर M.S. (Surgeon)	संचालक	९९२२४४५९२७
१२	डॉ.सौ. विमलताई गणराज अढाऊ M.Sc. Ph.D.	संचालिका	२६६३०६३
१३	डॉ.सौ. प्रतिभाताई साहेबराव विधळे M.Sc., Ph. D	संचालिका	२६६३७१६
१४	सौ. सुजाताताई भाऊराव वावरे M.A., Eco., Soci.	संचालिका	२५३१००६
१५	ॲड. रवींद्र पुंडलिकराव तायडे M.Com., L.L.B.	संचालक	२५६७८६२, ९३२५५३७०८५
१६	श्री चैतन्य कृष्णराव इंगळे Chartered Accountant	संचालक	९४२२८८८२३७
१७	श्री राजेंद्र पुंडलिकराव अढाऊ DC. EBE. (Civil)	संचालक	९३७०१५४३५३

१ इंजि.
Charl

२ इंजि.
B. E.

३ इंजि.
B. E.

४ इंजि.
D.C.R.

५ इंजि.
B.E. (C

६ डॉ. अ
M.D.(K

७ श्री ए
B.Com

८ श्री भ
M.Com

९ इंजि.
B.E. (C

१० प्रा. अ
M.Sc.

११ डॉ. व
M.S. (S

१२ डॉ.सौ
M.Sc. P

१३ डॉ.सौ
M.Sc.,

१४ सौ. स
M.A., B

१५ ॲड. स
M.Com

१६ श्री चै
Charter

१७ श्री रा
DC. EB

इंजि. अविनाश अं. कोठाळे
MIE, L.L.B., ADIM, DMM
अध्यक्ष
Chartered Engineer, ७७, यशोदा नगर, पूर्व भाग २, अमरावती

इंजि. राजेंद्र शं. जाधव
B.E. (Mech.)
उपाध्यक्ष
उद्योजक, जाधव ॲग्रो इन्डस्ट्रीज, सातुर्णा, बडनेरा रोड, अमरावती

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती

मुख्य कार्यालय : १ ला माळा, खत्री कॉम्प्लेक्स् बालकट कंपाऊंड, अमरावती
फोन - २५६००५७, २५७००५६, फॅक्स (०७२१) २५६६१५६

अंडर सर्टीफीकेट ऑफ पोस्टींग

क्र. जिजाऊ/आमसभा/१०/७३५/२०१०
आषाढ कृ. ५ शके १९३२, शिवशके ३३७
दि. ३१ जुलै २०१०

सन्माननीय,
भागधारक सभासद, बंधु / भगिनींनो,
सस्नेह जय जिजाऊ.

जिजाऊ कमर्शियल को-ऑप बँक लि., अमरावती ची **१० वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. १४ ऑगस्ट, २०१० रोजी सायंकाळी ५.३० वाजता, राजवाडा सभागृह, हॉटेल गौरी इन, मोर्शी रोड, अमरावती** येथे खालील विषयानुसार कामकाज चालविण्या करीता **आयोजित केलेली आहे.** तरी आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

संचालक मंडळाचे आदेशान्वये
दिनकर सातोकर
मुख्य कार्यपालन अधिकारी

सभेची विषय पत्रिका :

१. मागील आमसभा दि. १४.०८.२००९ चे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. सन २००९-२०१० (३१ मार्च २०१०) अखेर हिशोबाची पत्रके, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक मंजूर करणे.
३. सन २००९-१० ह्या वर्षात झालेल्या नफ्याचे विनियोजनास मंजूरात देणे.
४. बँकेचे सन २०१०-११ ह्या वर्षाचे अंदाज पत्रक मंजुर करणे. २००९-२०१० चे प्रत्यक्ष खर्चास मंजूरात देणे.
५. बँकेचे पोटनियम दुरूस्ती प्रस्तावास मान्यता देणे.
६. बँकेची बाहेरील कर्ज उभारणीची मर्यादा ठरविणे.
७. बँकेचे अंतर्गत तपासणी करीता ऑडीटरची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकाकडील कर्ज प्रकरणाची नोंद घेणे.
९. २००९-२०१० चे ऑडीट नोट अवलोकन करणे.
१०. एकरकमी परतफेड कर्जप्रकरणांना मंजूरी देणे.
११. निवडक थकित कर्ज प्रकरनांना राईट ऑफ करण्यास मंजूरी देणे
१२. मा. अध्यक्षाचे परवानगीने वेळेवर येणारे विषय.

टिप - १. गणपूर्ती अभावी तहकुब झालेली सभा लगेच १ तासा नंतर त्याच दिवशी त्याच विषयावर त्याच ठिकाणी घेण्यात येईल त्या सभेस गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. बँकेचे कामकाजा विषयी सभासदांना प्रश्न विचारावयाचे असल्यास असे प्रश्न लेखी स्वरूपात सभेपूर्वी ३ दिवस अगोदर पाठवावे व पोच घ्यावी.
३. बँकेच्या भागधारकांनी बचत खाते उघडून लाभांश धनादेश बचत खात्यामध्ये जमा करावेत,बँकेत ज्या भागधारकांचे बचत खाते आहे त्यांच्या खात्यात लाभांष जमा केला आहे.
४. भागधारकांनी वारसाची (नॉमिनी) नोंद बँकेच्या दप्तरी करावी व भाग प्रमाणपत्राकरीता अचूक पत्ता बँकेत नोंदवावा. ३१ मार्च २०१० च्या स्थितीवर भाग प्रमाणपत्रांचे अनुक्रमांक सुधारित करण्यात आले. पुर्वी दिलेले भाग क्रमांक रद्द समजण्यात यावे.

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती

मुख्य कार्यालय : १ ला माळा, खत्री कॉम्प्लेक्स् बालापूर कंपाऊंड, अमरावती.
फोन - २५६००५७, २५७००५६, फॅक्स (०७२१) २५६६१५६

प्रेषक : अभियंता अविनाश कोठाळे
अध्यक्ष

अमरावती
३१ जुलै २०१०
आषाढ कृ. ५ शके १९३२,
शिवराज्याभिषेक, शके ३३७

सन्माननीय सभासद
सहकार बंधु व भगिनिंनो,
आदरपुर्वक जय जिजाऊ !
सुस्वागतम्-स्वागतम्-सुस्वागतम् !

राष्ट्रमाता, राजमाता माँ जिजाऊंनी सुराज्य व स्वातंत्र्याचे अंकुरीत केलेले १७ व्या शतकातील बिज २१ व्या शतकात आपल्या सर्वांना स्वहितापेक्षा समाजहिताला प्राधान्य देणारी सहकार संस्कृती वृध्दिंगत करण्यास प्रेरणा देत आहे. राष्ट्रप्रेम व सहकाराचा हा शतकोत्तर विचार आधुनिक युगातील **"बहुजन हिताय बहुजन सुखाय"**! या संकल्पनेसह **"अर्थसंपन्न समाजनिर्मिती"** करिता बँकींग क्षेत्राचे महत्व वाढविणार आहे. त्यामुळेच नतमस्तक होऊन त्रिवार वंदन करूया राजमाता, राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊंना !

आपल्या जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेचा सन २००९-१० चा १० वा वार्षिक अहवाल आपणास संचालक मंडळाच्यावतीने सादर करतांना मला अत्यानंद होत आहे ! आधुनिक बँकींग स्पर्धेच्या सहकाराच्या दशक वर्षात मार्गक्रमण करतांना समाज जीवनात बँकेबाबत वाढलेला विश्वास, ठेवीदारांनी बँकेवर केलेले अतुट व भरघोस प्रेम कर्जदारांनी नियमित कर्ज परतफेड करून दाखवलेली तत्परता, सदैव प्रेरणा व नविन जबाबदारीची विश्वस्त म्हणून जाणीव देत आहे ! अर्थसंपन्न समाज निर्मिती करिता सुरू केलेला हा १० वर्षांपूर्तीचा आर्थिक रथ आपल्या सर्वांनी आमच्या पंखांना दिलेल्या बळामुळेच नव्या शिखीजावर २१ व्या शतकात सर्वांनीशित माणूस घडविण्याचा शिवधनुष्य रेखित आहे!

७ ऑक्टोंबर २००० ला विजयादशमीच्या शुभदिनी दसरा निमित्त सुरू झालेली आपली बँक २००० ते २०१० या दशकात आधुनिक बँकींग स्पर्धेत अल्पावधीत १०१ कोटी उलाढाल करून अमरावती शहरात अग्रगन्य नामांकन प्राप्त करणारी सहकार क्षेत्रातील एकमेव बँक ठरलेली आहे. अर्थ संपन्न समाज निर्मितीची संकल्पना प्रत्यक्षात साकार करण्यात आपण यशस्वी झालो हे सांगतांना विश्वास वृद्धिंगत होतो. बँकेच्या १० व्या वार्षिक आमसभेत आपले सर्वांचे मनःपुर्वक स्वागत !

-: बँकेची प्रगती भागभांडवल व निधी :-



◉ भागभांडवल :

बँक स्थापनेसमयी १७१६ सभासद व २४.१६ लक्ष भागभांडवलावरून सन २००९-२०१० या आर्थिक वर्षामध्ये २१७.८२ लक्ष भागभांडवल आहे मागील वर्षाच्या रू. २४५.०२ लक्षाच्या तुलनेत २०.५४ टक्के घाट आहे. सभासद संख्येमध्ये ३४९२ वरून ३७३४ वाढ अहवाल वर्षात आहे. भागधारकांना गुंतवणुकीवरील सुयोग्य परतावा लाभांशाद्वारे मिळत असल्याने त्यांचा विश्वास वृध्दींगत होत असल्याची ही मावती आहे.

सुखी व संपन्न राष्ट्र सहकारातुनच शक्य आहे.

◉ निधी :



राखीव व इतर निधी मध्ये इमारत निधी, लाभांश समिकरण निधी, वाईट व संशयित निधी तरतुद, बटघट निधी, गुंतवणूक व जोखिम निधीचा समावेश असुन सन २००९-२०१० चा अहवाल वर्षात निधी रू. ९९७.४६ लक्ष आहे. सदर निधीमध्ये रू. २१६.०९ लक्ष वाढ आहे. सदर निधी अत्यंत उपयुक्त आहे.

◉ ठेवी :



सन २००९ मध्ये रू. ५२७८.९१ लक्ष ठेवी होत्या त्यामध्ये ८५४.२२ लक्ष वाढ होवून अहवाल वर्षात एकूण रू. ६१३३.१३ लक्ष ठेवी आहेत. ठेवीमध्ये १६.१४ टक्के वाढ ठेवीदारांचा बँकेवर असलेल्या विश्वासार्हतेचे प्रतिक आहे. ठेवीदारांचे अद्भुत प्रेम व विश्वास वृध्दिंगतच होईल हा विश्वास सर्वच संचालकांना विश्वस्ततेच्या नात्याने आहे.

जिजाऊ बँकेची प्रगती व सांपत्तीक स्थिती खालील तक्त्यावरून अधिक स्पष्ट होईल.

(आकडे लाखात)

साल	सभासद	भागभांडवल लक्ष रू.	राखीव व इतर निधी लक्ष रू.	ठेवी लक्ष रू.	कर्ज	गुंतवणूक	खेळते भांडवल	निव्वळ नफा (लक्ष रू.)	अभिप्राय
२०००-०१	१७८५	३१.४८	३.५५	२६२.१८	२०३.७६	३७	३०७.३०	१०.०२	७ ऑक्टो. २००० पासून बँक सुरू झाली
२००१-०२	१९८०	५०.७९	९.७०	८०५.०८	६००.४५	१७३	६३९.८३	१०.६३	
२००२-०३	३११५	६०.७०	२३.५८	१०५३.४९	७९९.१०	२५५.९२	१२७४.७५	१२.३४	
२००३-०४	३३०३	७९.६४	४२.५९	१४४२.३७	१००९.५०	५९४.८०	१७५०.३२	४०.२९	"भारतीय प्रतिभूतीमधील नफा मध्ये
२००४-०५	३४४६	१०२.१४	११६.२०	१६४३.५४	१३०९.३१	५४१.९६	२०९५.६३	२०.००	
२००५-०६	३७१९	११९.४९	२१८.७६	२५६९.१४	१६७८.०४	१२७९.५४	२१६३.५३	२४.५०	
२००६-०७	२९३८	१३७.०१	२६४.८८	३१००.९३	२१६२.७९	१४९४.४८	४०१५.९३	१३.४२	तरतुदी वजावजाने नफा नगण्य राही.
२००७-०८	३२३४	२०२.५५	५३१.४९	४४३५.११	३२४३.३३	१४२३.५६	५५३३.९६	५०.००	सहकारी बँकांना इनकमटॅक्स लागू.
२००८-०९	३४९३	२४५.०३	७८१.३५	५२७८.९१	३८३०.९०	२३९६.७१	६४९१.३१	४७.९९	प्रॉव्हिजनसाठी तरतुदीमध्ये वाढ झाल्याने नफा
२००९-२०१०	३७३४	२९७.८२	९९७.४६	६१३३.१३	४०२३.५३	२९९९.०८	८०३५.२९	६३.२२	

◉ ठेवीदारांची सुरक्षितता :

ठेवीच्या सुरक्षेकरीता रिझर्व बँकेचे उपक्रमाअंतर्गत विमा आणि जमा गॅरंटी महामंडळाकडे (DICGC) नियमीतपणे बँक जुन व डिसेंबरच्या शेवटच्या शुक्रवारी असलेल्या सर्व ठेवीवर विमा प्रिमियम अर्धवार्षिक जमा करते. अहवाल वर्षात रू. ५.८३ लक्ष प्रिमीयम भरला आहे. बँकेचे एकूण डिपॉझिटवर अर्धवार्षिक प्रिमियम आहे. ठेवीदारांचे प्रत्येकी एक लक्ष रूपये महामंडळाकडून सुरक्षित करण्यात आले आहे. ग्राहकांची सुविधा अबाधित आहे.

◉ बँकामधील गुंतवणुक :



रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार १०% सहकारी बँकामध्ये व १५% शासकीय प्रतिभुतिमध्ये गुंतवणुक करण्याबाबत निर्देश आहेत. मार्च २०१० पर्यंत शासकिय प्रतिभुती मध्ये १५ % गुंतवणुक अनिवार्य होती त्यानुसार अहवाल वर्षात विविध बँकामध्ये जिजाऊ बँकेची एकुण रू. २३१७.७८ लक्ष गुंतवणूक आहे. शासकीय प्रतिभुतिमधील रू. ६८१.३० लक्ष गुंतवणूक आहे व रू. ३४१.०० लक्ष स्टेट बँकेमध्ये, रू. ७२० ९६ लाख अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अमरावती, रू. ३६५.५० लाख दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व इतर बँकेत रू. ८९०.३२ लाख ठेवी आहेत. इतर विनिर्दिष्टीत बँकामध्ये केलेली गुंतवणूक ४८.८९ टक्के बँकेच्या रू. ६६६६.४६ लक्ष ३१ मार्च २०१० ला असलेल्या Net Demand and Time Liability (NDTL) नुसार आहे. बँकामधील सर्व ठेवी सुरक्षित आहेत त्यावर बँकेला सरासरी १०.२५ टक्के व्याज मिळते. संचालक मंडळाने बँकेचे गुंतवणुक धोरण मंजूर केले असून त्यानुसार बँकेचे फंडसवर व्याज मिळण्याच्या दृष्टीने सुयोग्य गुंतवणुक करण्याचे अधिकार मुख्य कार्यपालन अधिकारी यांना प्रदान केले आहे.

◉ शासकीय प्रतिभुतीमधील गुंतवणूक :

बँकेने एकूण रूपये ६८१.३० लक्ष गुंतवणूक शासकीय प्रतिभुती मध्ये रिझर्व बँकेने निर्देशीत केल्यानुसार केली. शासकीय रोख्यांचे दर्शनी किंमतीमध्ये घट झालेली आहे. बँकेकडे असलेल्या शासकीय रोख्याचे विवरण HTM, HFT व HFS, या वर्गवारीमध्ये खालील प्रमाणे आहे.

(आकडे लाखात)

Sr. No.	Held to Maturity (HTM)		Held for Trading(HFT)	Held to Sale (HFS)	३१ मार्च २०१० चे दर
1.	7.46 GOI 2017	Rs. 50.00	Nil	Nil	98.78
2.	5.69 GOI 2018	Rs. 35.60			86.18
3.	6.01 GOI 2028	Rs. 80.70			77.35
4.	6.13 GOI 2028	Rs. 75.00			87.88
5.	6.17 GOI 2023	Rs. 90.00			82.89
6.	6.25 GOI 2018	Rs. 150.00			91.62
7.	8.24 GOI 2027	Rs. 200.00			98.75
	TOTAL	Rs. 681.30	Nil	Nil	सरासरी ८९.०६

शासकीय प्रतिभुतीचे दर्शनी मुल्य रू. १००/- आहे. सदर एच.टी.एम. वर्गवारीमध्ये ठेवलेल्या रोख्यांवर निर्देशित व्याज मिळत आहे. बँकेला शासकिय प्रतिभुतीमधील व्याज मिळकतीमध्ये तोटा येत आहे. नियमानुसार सदर तोट्याकरिता Investment Depreciation Reserve फंड निर्माण केला असुन त्यामध्ये रू. ८.८५ लक्ष ची तरतुद आहे.तसेच शासकिय प्रतिभुतीची दर कमी असल्याने सदर तोट्याचे समायोजना करीता Investment Fluctuation Fund रू. ३१.२२ लक्ष आहे. शासकिय प्रतिभुती मध्ये ३१ मार्च ला मागणी नोंदवीली व व्यवहार एप्रिल २०१० मधे झाला व एकूण माहे एप्रिल १० मध्ये रू. ९८१.३० लक्ष शासकिय प्रतिभुती निर्धारित मापदंडानुसार आहेत.

बँकेची नॉन एस.एल.आर. गुंवतणूक महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या भाग रू. १००००/- व अमरावती जिल्हा सहकारी अधिकोषात रू. १००० असे एकूण रू.०.११ लक्ष आहे. अहवाल वर्षात ३१ मार्च ला Non SLR गुंतवणुक निरंक आहे. तसेच LIC Liquid fund मधुन Non SLR गुंतवणुकी मधुन उत्पन्न मिळाले आहे.

◉ ठेवीवरील देणे व्याज :

ठेवीदारांचे देणे देय दिनांकाला मिळणेकरता अहवाल वर्षात व्याजाची तरतुद रू.४६१.६१ लक्ष केली आहे. ठेवीवर बँक ५.५% ते ८% पर्यंत मुदतीनुसार व्याज ग्राहकांना देते. जेष्ट नागरिकांना ०.५% टक्के बँक व्याज जास्त देते. इतर राष्ट्रीयकृत बँकांपेक्षा १% जास्त व **सुसंचालीत सहकारी बँकांपेक्षा ०.२५%** जास्त व्याज दर ठेवीदारांना योग्य परतावा मिळावा या दृष्टीने दिलेला आहे. स्पर्धेमध्ये ठेवीवरील व्याजदर इतर बँकाप्रमाणेच असणे निकोप वृध्दीकरिता गरजेचे आहे.

◉ रोखनिधी व तरती जिंदगी :

सहकारी बँकांनी रिझर्व बँकींग रेग्युरेशन ॲक्ट १९४९ मधील कलम १८ व २४ नुसार रोख निधी (CRR) ३% व तरती जिंदगी (SLR) २५% राखने अनिवार्य असल्याने बँकेने वर्षभर विहीत मर्यादा निकषानुसार राखून आर.बी.आय. च्या निर्देशाचे पालन केले आहे. सदर प्रमाण अधिक बाजूस असल्याने Non SLR गुंतवणुक वाढविणे आवश्यक आहे. परंतु शासकिय प्रतिभुती बाजारभाव संतुलित नसल्याने बँकेने विविध बँकांचे ठेवीमध्येच गुंतवणुक केली आहे.

◉ कर्जव्यवहार व कर्ज वितरण :

बँकेने एकूण २०५१ ग्राहकांना ४०२३.५३ लक्ष कर्ज वाटप केले आहे. अहवाल वर्षात १९२.६३ लक्ष कर्ज वाटप केले व कर्ज वाटपातून बँकेस ४७८.५४ लक्ष व्याज मिळाले आहे.



RBI चे धोरणानुसार एक्सपोझर लिमिट अंतर्गत बँकेने प्रतिव्यक्तिस महत्तम ५० लक्ष कर्ज तर कंपनी व एकत्रित कर्ज १२५ लक्ष मर्यादा निर्धारित केली आहे. बँकेने अहवाल वर्षापर्यंत एकूण रूपये ४०२३.५३ लक्ष कर्जवाटप एकुण २०५१ सभासदांना केले. त्यामध्ये अहवाल वर्षात एकूण ७३०.६१ लक्ष कर्ज ३८३ कर्जदारांना वाटप केले व २८३ सभासदांनी ७३०.६१ लक्ष कर्ज निरंक केले.

प्रामुख्याने सदर कर्जपैकी रू. ११७४.८६ लक्ष (२९.१९%) हे कॅश क्रेडीट, रू. १०६२.५३ लक्ष (२६.४०%) हे गृहबांधणी, घरदुरूस्ती, फ्लॅट घेणे इत्यादी वरील असून ४३२.३२ (१०.७४%) वैयक्तिक तारणावर कर्ज दिले आहे. रू. ३३४.४२ लक्ष (८.३१%) वाहन कर्जावरील आहे. शेती विकत घेणे, विकास करणे, पिक कर्ज एकूण रूपये ३३४.४२ लक्ष (८.३१%) आहे. तसेच तारणावर कर्ज रू. ३१५.७७ लक्ष (७.८४%) आहे. गृह बांधणी कर्ज १५ % पर्यंत मर्यादित करण्याचे RBI चे निर्देश आहेत. त्या दृष्टिने सातत्याने गृहकर्ज कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

बँकेचे कर्ज वाटप रक्कम निहाय वर्गवारी खालीलप्रमाणे आहे

अ.क्र.	कर्ज रक्कम (रूपये मध्ये)	एकूण कर्जदार	टक्केवारी	कर्ज वाटप	टक्केवारी
१.	२५००० पर्यंत	६६४	३२.३७	७६.१७	१.८९
२.	२५००१ ते ५०००० पर्यंत	३८३	१८.६७	१३२.७१	३.३०
३.	५०००१ ते १००००० पर्यंत	२०८	१०.१५	१४८.८५	३.७०
४.	१००००१ ते ५००००० पर्यंत	५९५	२९.०१	१४७५.५४	३६.६७
५.	५००००१ ते १०००००० पर्यंत	१३७	६.६८	९५१.२२	२३.६५
६.	१०००००१ ते २५००००० पर्यंत	५२	२.५४	७९२.९१	१९.७०
७.	२५ लक्ष पेक्षा जास्त	१२	०.५८	४४६.१३	११.०९
	एकूण	२०५१	१००%	४०२३.५३	१००%

अहवाल वर्षात बँकेने रिझर्व बँकेच्या मापदंडानुसार अग्रक्रम क्षेत्रास रू. ७१.२७ टक्के कर्ज वाटप करून निर्धारीत ७० टक्के मापदंड साध्य केले आहे. तर दुर्बल घटकास रू. १७.८४ लक्ष कर्ज वाटप केले.

किचे ६९.२० % कर्ज हे १० लक्ष मर्यादिमधील असून ९६.८७ टक्के कर्जदाराकडे आहे. व उर्वरित ३०.८०% कर्ज ३.१२% कर्जदारांकडे आहे. बँकेच्या कर्ज मागणी मध्ये समप्रमाणता आणण्याचा प्रर्यत्न आहे.

नियमित कर्ज परतफेड व चांगल्या कर्ज धारकांकरिता बँकेने १% सुट व्याजदरात देण्याचा निर्णय चालु आहे. चांगल्या ग्राहकांची कर्ज मागणी वाढावी हा या मागचा उद्देश आहे. नियमित परतफेड करणाऱ्या चांगल्या कर्जदारांचे बँकेत स्वागत आहे. मंजूर कॅश क्रेडीटच्या १० पट वार्षिक व १ पट मासिक नियमित व्यवहार असल्यास केवळ १२% व्याज इतर सर्वच बँकापेक्षा कमी आहे.

बँकेने कर्जप्रकारनिहाय वाटप केलेल्या कर्जाचा वार्षिक गोषवारा (आकडे लाखात)

अ.क्र	कर्जाचा प्रकार	०३-०४	०४-०५	०५-०६	०६-०७	०७-०८	०८-०९	०९-१०
१	कॅश क्रेडीट	४६४.८७	६६८.६९	७६८.७९	९९९.८०	११३५.७२	१२२२.३४	११७४.८६
२	गृह तारण	२२७.३५	२२४.२२	२७९.७८	४०८.०१	८८१.३१	११७१.३४	१०६२.५३
३	वैयक्तिक तारण	१५३.३५	२५४.५५	३३१.२४	३७०.००	४४२.६१	४५४.२६	४३२.३२
४	हायपोथिकेशन	३७.१२	३६.२९	१२२.११	१६९.०१	२२५.५१	२७४.३०	३९५.७७
५	वाहन कर्ज	४८.२९	५६.२३	५५.०१	१२२.६१	३०८.४७	३४२.५०	३३४.४२
६	वैयक्तिक	१२.९२	७.५१	६.६२	६.१८	६.७३	९.२३	१८.२३
७	मुदतीठेव तारण	२६.९४	४३.०६	१०६.८२	७७.४८	६०.२५	१०४.३६	१०३.६२
८	शासकीय सेक्युरिटी	०४.५९	५.१२	१३.६३	६९.०३	१०२.२२	४३.१२	४०.८९
९	बिल डिस्काँऊंटींग	३१.०८	५.४४	--	०.३२	०.३३	--	--
१०.	इतर स्टाफ कर्ज	००.०६	०.१०	०.१२	०.४५	९.२५	९.५२	१.१७
११.	शेती कर्ज	--	--	--	१९.९०	७०.७७	१५६.१३	१४७.३७
१२.	शैक्षणिक कर्ज	--	--	--	--	५.०९	३६.३६	३४.७५
१३.	सोने तारण कर्ज	--	--	--	--	३.५५	१४.८२	२८.६४
१४	लोनअगेन्स्ट प्रॉपर्टी	--	--	--	--	--	--	२७२.६८
१५	सीसी एफ.डी.आर.	--	--	--	--	--	--	२५६.६७
	एकूण	१००९.५०	१३०२.०१	१६४६.०४	२१६२.८९	३२४३.३३	३८३०.९०	४०२३.५३

बँक सभासदांना, शिक्षण, घर खरेदी, प्लॉट खरेदी, शेती खरेदी, बांधकाम, व्यापार उद्योग विकास, आजारपण, वाहन खरेदी, मशिनरी खरेदी इत्यादी कारणाकरीता कर्ज उपलब्ध करून देते. **बँकेने शिक्षणाकरिता २० लक्ष रूपये महत्तम मर्यादा केली** आहे. **नविन कार खरेदी करीता १० वर्ष मुदती करीता दिर्घमुदती परतफेडीचे** योजना विविध शासकिय, निमशासकिय सेवेत काम करणाऱ्या व्यक्तिंसाठी केवळ आपल्याच बँकेमध्ये आहे. **सदर कर्जाचा व्याजदर फ्लॅट ७.५०% पर्यंत आहे. दुचाकी वाहनाकरिता ३ वर्ष परतफेडीमध्ये ६% फ्लॅट रेटने केवळ १ जमानतदार घेऊन तात्काळ व्यवस्थापक स्तरावर कर्ज देणारी**

केवळ आपलीच बँक आहे. देश, विदेशातील पर्यटनाकरिता बँक कर्ज पुरवठा करते. तसेच नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना कृषीमाल तारण कर्ज, घर बांधणे, शेती विकास करणे व लग्नाकरिता कर्ज बँक देत आहे. कोणत्याही व्यक्तीस सोने तारण कर्ज सोन्याच्या बाजार भावाच्या ६०% तात्काळ देण्याची सुविधा बँकेने अनेक ग्राहकांना उपलब्ध करून दिली आहे.

अहवाल वर्षात ५.०२% वाढ कर्ज वाटपात झाली. प्रामुख्याने सदर ४०२३.५३ लक्ष कर्ज रकमेमध्ये ० ते ६ महिन्यात १३.२७% रक्कम, ६ ते १ वर्ष २.११% रक्कम, १ ते ३ वर्षात ३५.१८% रक्कम, ३ ते ५ वर्षामध्ये ११.३५% तर ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीमध्ये ३८.०९% रक्कम परतफेड करणे अपेक्षित आहे.

◉ कर्जवितरण व एन.पी.ए. तरतुद :

बँकेने अहवाल वर्षात बँकेच्या अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए.) मापदंडानुसार एकूण रू. ८३०.६६ लक्ष रूपये एन.पी.ए. कर्ज ठरविलेले असून नक्त अनुत्पादक कर्ज २.४२ टक्के आहे. बँकेने चालु वर्षीच्या नफ्यातुन एन.पी.ए. तरतुद रू. १३८.०० (लाख) केलेली आहे. बँकेजवळ एकूण रू. ७५१.४१ लक्ष वाईट व संशयित बुडीत कर्जासाठी आतापर्यंत जमा आहेत. संविधानीक ऑडीटर यांनी बॉर्डर लाईन प्रकरणे गृहीत धरल्याने एन. पी. ए. मध्ये मुळ कर्जात रू. २४६.८३ लक्ष वाढ झालेली आहे, ही वाढ ६.१३ टक्के आहे. संविधानिक ऑडीटर नुसार नक्त अनुत्पादक कर्ज ९.९६ % आहे. अहवाल वर्षात अनुत्पादक जिंदगीचे खातेनियमित करण्यासाठी **"कर्ज वसुली पथके"** तयार करण्यात आली व थकित कर्जदारांना भेटी देणे, समजावून सांगणे, कोर्टात प्रकरण दाखल करणे सुरू आहे.

सन २००९-१० मध्ये रिझर्व बँकेचे नियमानुसार तीन महिन्यात किस्त किंवा व्याज न आल्यास खाते अनुत्पादक समजण्यात येत आहे. आंतरराष्ट्रीय आर्थिक धोरणाशी स्पर्धा करण्यासाठी खुल्या अर्थव्यवस्थेत टिकण्याच्या दृष्टीने कर्जदारांमध्ये ''आर्थिक शिस्त'' लावणे हा हेतू आर.बी.आय. चा आहे. (N.P.A. नही पैसा आया) कर्जाने घेतलेल्या रक्कमेची परतफेड करणे प्रत्येक कर्जदाराची नैतिक जबाबदारी आहे.

बँकेचे नक्त अनुत्पादक कर्ज (एनपीए) किमान ३ टक्केपेक्षा कमी असणे चांगल्या बँकेचे लक्षण आहे. यासाठी कर्जदार सभासदांच्या नियमित कर्ज फेडीची मनापासुन साथ पाहिजे. बँकेने सामोपचार पध्दतीने कर्ज निरंक करण्याचे धोरण तयार केले आहे. थकित कर्जदारांना एकमुस्त रक्कम भरल्यास व्याजामध्ये बँकेच्या परतफेड धोरणानुसार सुट देण्यात येत आहे. थकित कर्जदारांनी त्वरीत संपर्क साधावा व बँकेस सहकार्य करावे.

◉ एन. पी. ए. कमी करण्याकरीता उपाय :

आपल्या बँकेचे एनपीएचे प्रमाण कमी करण्याकरीता बँकेचे कर्जदार ह्यांनी त्यांच्या अडचणींची बँकेला कल्पना द्यावी व तत्परतेने खाते सुरळीत करण्याकरीता तात्काळ कार्यवाही करावी, ही विनंती. कर्ज खात्यामध्ये मुद्दल व व्याज नियमितपणे भरलेले असावे. खात्यामध्ये सुरळीतपणे व्यवहार सुरू करावे. मासिक किस्त न भरलेल्या कर्जदारांनी तात्काळ संपर्क साधून खाते नियमित करावे. थकित खातेधारकांनी आपले खाते पुर्नरचित करण्याकरीता अर्ज सादर केल्यास विचार होईल.

बँकेचे कॅश क्रेडीट सुविधा उपभोगणारे कर्जदार, सभासद त्यांच्या व्यवसायाच्या मागणीनुसार उचल करतात परंतु कधी कधी रक्कम कमी असतांना त्यांचे खात्याअंतर्गत जास्त मागणी (ओव्हर ड्राफ्ट) करतात. तसेच परस्पर बँकेची मंजुरी न घेता धनादेश देतात व धनादेश परत केल्यानंतर बँक सहकार्य करीत नाही असे ओरड करतात.

कोणत्याही प्रकारचे मंजूर कर्जापेक्षा जास्त उचल देण्यास रिझर्व बँकेने निर्बंध लावलेले असल्याने सभासदांनी अशा प्रकारे ओव्हर ड्राफ्ट न घेता स्वत:मध्ये आर्थिक शिस्त आणावी व नियमानुसार खाते, व व्यवहार सुरू ठेवावे.

◉ संचालकाकडील कर्ज :

रिझर्व बँकेच्या निर्देशनानुसार बँकेने अहवाल वर्षात कोणतेही नविन कर्ज संचालक अथवा त्यांच्या नातेवाईकांना मंजुर केलेले नाही. पुर्वी दिलेल्या कर्जाची वसुली सुरू आहे. त्यांच्या खात्याचा देय तारखेला सर्व कर्ज निरंक होतील. सद्यस्थितीत दिनांक ३१ मार्च २०१० च्या तारखेवर संचालक मंडळ व त्यांच्या नातेवाईकांकडील कर्जाची रक्कम केवळ ४.०९लक्ष असुन एकूण कर्जाशी त्याचे प्रमाण फक्त ०.१०% आहे. सदर मर्यादा पुर्वी ५% होती. त्यावेळी कर्ज दिले.

◉ कर्जवसुली :

अहवाल वर्ष २००९-२०१० मध्ये एकूण रू. १११११.२६ लक्ष बँकेने कर्ज वसुल केलेले आहे. अहवाल वर्षात काही महत्वाच्या कर्जप्रकार निहाय वसुलीचा तक्ता खालील प्रमाणे आहे. *(आकडे लाखात)*

अ.क्र.	कर्जप्रकार	कर्ज रक्कम	कर्ज मागणी	कर्ज रक्कम वसुल
१.	सेक्युअर्ड पर्सनल कर्ज	४३२.३२	२६४.००	१९८.२६
२.	हाऊस मॉर्टगेज कर्ज	१०६२.५३	३८६.९३	३०९.५५
३.	हायपोथिकेशन कर्ज	५१५.७७	११२.३०	८४.२३
४.	वैयक्तिक लोन कर्ज	८.२३	७.४६	४.८५
५.	वाहन कर्ज	३३४.४२	२२०.१०	१६५.०७
६.	कॅश क्रेडीट	११७४.८६	३२४.००	२८९.१८
७.	शैक्षणिक कर्ज	३४.७५	१२.७६	१०.८७
८.	सोने तारण कर्ज	२८.६४	--	--
९.	शेती कर्ज	१४७.१७	५६.००	४८.६५
१०.	इतर कर्ज (मुदत ठेव + शासकिय प्रतिभुती)	१४४.११	--	--
११.	लोन अगेन्स्ट प्रॉपर्टी	२७२.६८	--	--
१२.	सीसी अगेन्स्ट एफ.डी.आर.	५६.६७	--	--
	एकूण	४०२३.५३	१३८३.५५	११११.२६

नियमितपणे कर्जफेड करणारा सभासद बँकेचा हितचिंतक असुन बँकेला अश्या कर्ज घेणाऱ्या भागधारकाकडून फायदा होतो. **जे कर्जदार नियमित कर्जाची परतफेड करित नाही त्यांच्यामुळे बँकेला व्याज मिळत नाही. उलट मिळालेल्या उत्पन्नातुन अनुत्पादक कर्जाकरीता तरतुदी कराव्या लागतात.** अहवाल वर्षात एकुण अनुत्पादक कर्ज रक्कम रूपये १०७७.४९ लक्ष आहे. उद्योगातील मंदी, कमी पाऊस, उत्पन्न कमी व थकित कर्जदारांची नकारात्मक

मनोवृत्ती यामुळे बँकेचे नक्त अनुत्पादक कर्ज अहवाल वर्षात वाढले आहे. सर्व थकित कर्जदार सभासदांनी स्वत:मध्ये आर्थिक शिस्त आनणे अपरिहार्य असून थकित कर्ज तात्काळ भरणे अपेक्षित आहे. थकित कर्जदारांना ४% दंडीत व्याज आकारण्यात येत असल्याने नुकसान त्यांचेच आहे व शेवटी बँक तारणातील अथवा घरातील स्थावर किंवा जंगम कोणतीही वस्तु विकू शकत असल्याने अशी वेळच येणार नाही यास्तव थकित कर्जधारकांनी कर्ज निरंक करण्याकरिता बँकेशी संपर्क साधावा. कर्ज वसुली करिता अहवाल वर्षात नियमित वसुली अधिकारी व कंत्राटी पद्धतीने नेमलेले "वसुली संदेशवाहक" आहेत.

थकीत कर्ज वसूलीसाठी सहकार खात्याने एकरक्कमी कर्ज भरणा योजना कार्यान्वीत केल्यामुळे एकूण ११ थकित कर्ज धारकांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज दिलेत. ३१ मार्च २०१० पर्यंत एकूण ०५ कर्जदारांनी रू. ६.१४ लाख सामोपचार पध्दतीने निरंक केले आहे. तसेच थकीत कर्जधारकांनी तात्काळ थकीत कर्जाचा भरणा करून आपले खाते नियमित करावे. बँकेला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम १०१ अंतर्गत कर्ज वसुलीचे ४६ दाखले प्राप्त झाले. त्यामुळे त्या थकित कर्जदारांनी मालमत्ता विकण्यात येईल. सेक्युरीटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशीयल असेट अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ कायद्याअंतर्गत ५९ एकूण नोटीस दिलेल्या असुन विक्री कार्यवाही तात्काळ सुरू करण्यात येईल. त्यामुळे बँकेने प्रॉपटी विकल्यास ती कमी किंमतीत मागीतल्या जाते. तेव्हा थकित कर्जदारांनी स्वत:चे नुकसान करू नये. तसेच प्रतिष्ठा धालू नये हि आग्रहाची विनंती संचालक मंडळाच्यावतीने करतो.

◉ थकित कर्जधारकांसाठी विशेष सुचना :

निगोशियबल इन्स्ट्रुमेंट अॅक्ट १३८ अंतर्गत बँकेच्या कर्जधारकास कर्ज परतफेडीचा धनादेश न वटल्याने दोन वर्ष सक्तमजुरीची शिक्षा अमरावती येथील न्यायालयाने दिलेली आहे व हायकोर्ट बेंच नागपूर यांनी सुध्दा त्यात अनुकुलता एका प्रकरणात दर्शविली आहे. कर्ज परतफेड धनादेश देवून वसूली न दिलेल्या ८० सभासदांवर अमरावतीचे विविध कोर्टात केसेस सुरू आहे. त्यांनी रक्कम न भरल्यास त्यांना सक्त मजूरीची शिक्षा होवू शकते. कोणत्याही कर्जधारकास शिक्षा व्हावी हा उद्देश नाही. परंतु कर्ज नियमित, प्रामाणिकपणे भरणे ही रास्त अपेक्षा आहे. थकित कर्जदारांच्या मालमत्तेचा लिलाव करणे, त्यांचे घरी "धडक वसुली पथक" वारंवार येणे ह्या बाबी बँकेला सुद्धा नको असतात. लोकांची रक्कम विश्वासाने कर्ज म्हणुन बँकेने सर्व सामान्य लोकांच्या ठेवीमधून दिलेली असल्याने सामाजिक भान म्हणुन कर्ज परतफेड करणे ही कर्तव्यदक्ष, प्रामाणिक कर्जदार नागरीकांची जबाबदारी आहे. कठोर निर्णय घेण्याची वेळ बँकेवर आणु नये हि थकित कर्जदारांना विनंती. अडचणी प्रत्येक व्यक्तिला असतात परंतु प्रामाणिक प्रयत्न केलास आर्थिक अडचणीवर मात करता येवू शकते. "थेंबे थेंबे तळे साचे" या उक्तीप्रमाणे रोजच्या रोज थकित रक्कम भरा व सहकार्य करा.

◉ नफा व विनियोग :

अहवाल वर्षामध्ये बँकेला एकुण उत्पन्न रू. ७७१.१३ लक्ष मिळाले. त्यामध्ये प्रामुख्याने कर्जाचे व्याजातुन रू. ४७८.५४ लक्ष, बँकींग व्यवहार रू. ६.३७ लक्ष इतर रू. १२.८५ लक्ष उत्पन्न मिळालेले आहे. एकुण उत्पन्नातुन सर्व व्याज, इतर देणे व तरतुदी नंतर अनुत्पादक कर्जाकरिता रू. १३८.०० लक्ष, इतर बाबींकरीता रू. ६२.३२ लक्ष तरतुद गृहीत धरता बँकेला निव्वळ नफा रू. ६३.२२ लक्ष आहे. बँकेचा प्रस्तावित लाभांशाचा दर १ वर्षाकरिता असलेल्या ठेवीच्या दरापेक्षा जास्त मिळणे अपेक्षित असल्याने अहवाल वर्षात सर्व नियमानुसार तरतुदी करून संचालक मंडळ १५ टक्के लाभांश देण्याचे प्रस्तावित करीत आहे.

◉ आयकर टॅक्स व इतर :

बँकेने इनकम टॅक्स, सर्व्हिस टॅक्स, मनपा टॅक्स इत्यादि सर्व टॅक्स नियमित भरले आहे. बँकेला मिळालेल्या नक्त नफ्यावर बँकेला इनकम टॅक्स भरावा लागतो. टॅक्स करिता रू. २० लक्ष तरतूद केली आहे. टॅक्स ऑडीट नंतर अचुक रक्कम भरण्यात येते.

◉ लाभांश :

अहवाल वर्षात बँकेला रू. ६३.२२० लक्ष नफा झाला असून बँकेचे ३१ मार्च २०१० चे भागभांडवल रू. २९७.८२ लक्ष रूपयावर **बँकेच्या भागधारकांना १५% लाभांश प्रस्तावीत केला आहे.** बँकेने २००८-०९ ला १०% लाभांश जाहीर केला होता. १ वर्षाचे व्याजदर सर्वच राष्ट्रीयकृत बँका तसेच सहकारी बँकेमध्ये ६ ते ८% पर्यंत आहेत. **अहवाल वर्षात बँक १५% लाभांश प्रस्तावित करीत आहे. सातत्याने सभासदांना त्यांचे भागभांडवलांवर लाभांश देणारी मोजक्याच बँकामधील आपली बँक अग्रगन्य बँक आहे.** सर्व सभासदांनी लाभांश करीता बँकेत बचत खाते उघडावे ही नम्र विनंती.

आपली जिजाऊ बँक सातत्याने नफ्यात आहे हे प्रगतीचे लक्षण आहे. आर. बी. आय. चे निकषाप्रमाणे बँक ग्रेड १ मध्ये आहे. संविधानिक ऑडीट नुसार "अ" श्रेणीत आहे. त्यामुळे लाभांश वाटप करणे शक्य आहे. **लाभांश वाटप विजयादशमीच्या शुभपर्वावर बँकेच्या वर्धापन दिनी सुरू करण्यात येईल.** मागील वर्षीच्या लाभांश ज्या खातेधारकांचे खाते आहे, त्यांच्या बचत खात्यात जमा केलेला आहे.

◉ संचालक मंडळ सभा व विविध समिती सभा :

सन २००९-२०१० कार्यरत संचालक मंडळामध्ये ६ अभियंते, २ डॉक्टर, ३ प्राध्यापक, २ बँक तज्ञ,१ ॲडव्होकेट, २ समाज सेवक व १ चार्टर्ड अकौन्टंट असून महिलांना निर्धारित प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे.

संचालक मंडळाच्या नियमित सभा होत असुन, अहवाल वर्षात एकूण १३ सभांमधुन बँकेच्या हिताचे विविध निर्णय घेण्यात आले. संचालक मंडळाचे व बँकेचे कामकाज सुलभ होण्याकरीता विविध समित्यांच्या सभामध्ये कर्ज समिती १७ सभा, अंकेक्षण समिती २, सभा, स्टाफ समिती ३ सभा, संगणक समिती ६ सभा, गुंतवणूक समितीच्या २ सभा, कर्ज वसुली व समोपचार समिती ३ सभा, असेट लायबिलिटी समिती १ सभा, एन.पी.ए. नियमन (मॉनिटरींग) ६ सभा घेण्यात आल्यात. **समित्यांचे कामकाज कोणताही स्वतंत्र मेहनताना भत्ते न घेता सुचारू पद्धतीने सुरू आहे.** सर्व समित्या अधिक कार्यक्षम पणे/स्वतंत्रपणे विविध निर्णयाकरीता उपयुक्त मार्गदर्शने करतील ही अपेक्षा.

संचालक मंडळातील तसेच विषय समितीच्या सर्वच संचालकांनी अथवा तज्ञांनी **विनामूल्य बँकहित आणि समाजहित लक्षात घेऊन मराठा सेवा संघाने समाजामध्ये रूढ केलेल्या "Pay Back to Society" ह्या ब्रिदाप्रमाणे नि:स्वार्थपणे काम केलेले आहे.** माझ्या सर्व संचालक सहकार्यांचे व समिती सदस्याचे आभार.

◉ लेखा परिक्षण :

सन २००८-०९ चे सविधानीक अंकेक्षण चार्टर्ड अंकाऊन्टंट सौ. निता झंवर यांनी केले होते. मागील वर्षाचा अंकेक्षण अहवाल आमसभेनंतर मिळाला. बँकेला त्यांनी **"अ"** ऑडीट वर्ग दिला होता तसेच त्यांचा अंकेक्षण अहवालाचा त्रुटीपुर्तता अहवाल विहित कालावधीत सादर केला. तद्नंतर सन २००९-१० चे अंकेक्षण सौ. मधू एस. मुतडा चार्टर्डड अकाऊन्टंट, यवतमाळ या संस्थेस सहकार आयुक्त तथा निबंधक सहकारी संस्था पुणे यांनी अधिकार प्रदान केल्यानुसार जिल्हा उपनिबंधक (लेखा) यांनी मे २०१० मध्ये दिले. सौ. मधू एस. मुतडा चार्टर्ड अकौन्टंट व त्यांचे सहकारी निलेश बजाज यांनी अहवाल वर्षाचे अंकेक्षण केले असुन बँकेला त्यांनी **"अ"** ऑडीट वर्ग दिला आहे. अंकेक्षण त्रुटी पुर्तता करून अनुपालन अहवाल विहित कालावधीत सादर करण्यात येईल.

◉ संचालक प्रशिक्षण :

रिझर्व बँकेने व सहकार खात्याने सर्व नागरी बँकांच्या पदाधिकाऱ्यांकरीता बँकींगची व भविष्यातील घडामोडींची माहिती होण्यासाठी व त्यानुसार बँकेचे धोरण ठरविण्यासाठी संचालकांना विविध प्रकारचे प्रशिक्षण अनिवार्य केले

आहे. संचालकांना प्रशिक्षणासाठी रिझर्व बँकेचे कॉलेज ऑफ अॅग्रीकल्चर बँकींग पुणे, तसेच वैकुंठ मेहता सहकारी प्रशिक्षण संस्था पुणे येथे संचालकांना पाठविण्यात येते.

◉ अंतर्गत अंकेक्षण :

सौ. निशिगंधा बंड, चार्टर्ड अकौन्टंट यांनी अंतर्गत अंकेक्षण केलेले असुन व्यवस्थापक स्थरावर त्रुटी पुर्तता करून कार्यवाही करण्यात आली आहे. दैनंदिन अंकेक्षणाचे कामाकरिता सहकार लेखा शाखेची सेवानिवृत्त अंकेक्षण अधिकारी यांना कंत्राटी पद्धतीने कार्यभार दिलेला आहे.

◉ बँकींग व्यवहार :

बँकेने विजयादशमीच्या शुभपर्वावर दिनांक ७ ऑक्टोंबर २००० ला बँकींग व्यवसाय सुरू केला. बँकेने वेळेत बदल केला असुन बँकींग व्यवहार हे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत मुख्य शाखा खत्री कॉम्प्लेक्स, वालकट कंम्पाऊंड अमरावती येथे होतात. तर गाडगेनगर शाखा सकाळी ८.४५ ते १२.३० व दुपारी ४.३० ते ७.३० पर्यंत ग्राहकांच्या सुविधेकरिता आहे. बँकेमध्ये ग्राहकांना लॉकर सुविधा दोन्ही शाखेत अल्पदरात उपलब्ध आहे. सभासदांना कर्ज त्वरीत वितरीत केले जाते. बँकेमध्ये विविध प्रकारच्या इतर बँकेच्या तुलनेत जास्त व्याज देणाऱ्या आकर्षक व्याजाच्या ठेव योजना आहेत. भारतभर कोठेही डीमांड ड्राफ्ट आपल्या बँकेतुन काढता येतो. ग्राहकांच्या सेवे करीता एल.आय.सी. चे प्रिमीयम भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. बँक क्लिअरींग हाऊस मेंबर असल्याने धनादेश त्वरीत वटवुन ज्याच्या त्याच दिवशी सायंकाळी तात्काळ रक्कम मिळते. बँकेच्या दोन्ही शाखा कोअर बँकींग असल्याने कोणत्याही शाखेत बँकींग व्यवहार करण्याची सुविधा ग्राहकांना उपलब्ध आहे.

◉ कर्मचारी वर्ग व प्रशिक्षण :

स्पर्धात्मक युगात ग्राहकांना अधिक संतुष्ट, उत्तम, विनम्र व तत्पर अर्थसेवा देण्याकरीता कर्मचारीवृंद कटिबद्ध राहतीलच हा मला विश्वास आहे. बँक कर्मचाऱ्यांनी ग्राहकांना दिलेली सेवा व बँकेचा वाढविलेल्या नावलौकिक या करीता कर्मचारी अभिनंदनास पात्र आहेत. सहकारी बँकेत कर्मचाऱ्यांमध्ये ही बँक माझी आहे व बँकेचे हित माझे हित आहे ही भावना सदैव वृध्दिंगत होऊन नियमांना अनुसरूनच काम सर्व कर्मचाऱ्यांनी सदैव करणे अपेक्षित आहे. कर्मचाऱ्यांमध्ये गुणवत्ता वाढावी त्यांचे वरील ताण कमी व्हावा. याकरिता बँकेतच २ दिवस प्रशिक्षण घेण्यात आले. कामनिहाय कर्मचाऱ्यांना जबाबदारी टाकण्यात आली. ज्याच्या कडे जे काम आहे त्या दोष आढळल्यावर त्याचेवर कार्यवाही करण्याचे नियम तयार केले आहेत.

कर्मचाऱ्यांना विविध सहकारी प्रशिक्षण संस्था, धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंध संस्था व रिझर्व बँकेच्या विद्यमाने आयोजित प्रशिक्षण वर्गाला वेळोवेळी पाठविण्यात आले. भविष्यात कर्मचाऱ्यांकरीता अधिक प्रशिक्षण बँकेतच आयोजीत करण्यात येतील.

◉ बँकेस अतिथींचे भेट आणि आभार :

बँकेचा ९ वा "वर्धापन दिन" मोठ्या उत्साहात विजयादशमीच्या शुभपर्वावर साजरा करण्यात आला त्यानिमित्त आयोजीत कार्यक्रमात प्रमुख अतिथी अभियंता बाळासाहेब टाले, संचालक, मुंबई बोर्ड ऑफ टेक्नीकल एज्युकेशन, मुंबई, हे उपस्थित होते. अहवाल वर्षात जिजाऊ स्मृतिदिनाला प्रमुख पाहूणे श्री. भास्कर पाटील, आयुक्त, माहिती आयोग, अमरावती तसेच प्रमुख अतिथी अॅड. विजय कोठाळे, हे उपस्थित होते. जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त प्रसिद्ध उद्योजक व बँकेचे उपाध्यक्ष श्री. राजेंद्र जाधव, प्रमुख अतिथी होते. देशगौरव सुभाषचंद्र बोस जयंती करीता प्रमुख पाहूणे रोहित निकम, सॉफ्टएड कंपनी जळगांव हे उपस्थित होते.

AMOUNT 31/03/2009	LIABILITIES	AMOUNT 31/03/2010	AMOUNT 31/03/2009	ASSETS	AMOUNT 31/03/2010
300800.00	20) Loan Contigent Fund	1400000.00	0.00	6) Axis Bank Ac No. 7115	97104.31
76136814.93		99745779.93	0.00	7) Axis Bank Ac No. 7108	3881.28
			4113005.64		2561527.59
	DEMAND DEPOSITS				
30235742.36	1) Current Deposit	30129959.34		INVESTMENT [F.D.R.]	
182673901.75	2) Savings Deposit	140446378.80	36550000.00	1) F.D.R. with M.S. Co-op. Bank Amravati.	36550000.00
1699132.85	3) Jijau Saving Link Deposit	2285457.38	5709618.00	2) F.D.R. with A.D.C.C. Bank	72096180.00
131320.00	4) Staff Security Deposit	131320.00	3410000.00	3) F.D.R. with State Bank of India, Amravati	34100000.00
194740096.97		173803114.59	12500000.00	4) F.D.R. with IDBI Bank, Nagpur	37631823.00
			5140000.00	5) F.D.R. with Bank of Baroda	51400000.00
	TIME DEPOSITS		191648180.00		231778003.00
23507950.00	1) Double Benefit Deposit	29980428.00			
3480489.00	2) Monthly Income Plan	4937858.00		INVESTMENT (Share)	
162010102.00	3) Short Term Deposit	256471465.00	10000.00	1) M.S. Co-op. Bank, Mumbai.	10000.00
964650.00	4) Monthly Recurring Deposit	1379456.00	1000.00	2) A.D.C.C. Bank, Amravati.	1000.00
5309674.00	5) Daily Recurring Deposit	9327189.00	11000.00		11000.00
1549050.00	6) Rajshree Shahu Shikshan Yojna	1549050.00			
26238891.00	7) Special Fixed Deposit	41010419.00	46130000.00	INVESTMENT IN GOVT. SECURITIES	
17611683.00	8) Sant Tukaram Arth Vrudhi Yojna	15467105.00		1) Investment in Govt. Securities	66130000.00
4573000.00	9) Sant Tukaram Smruti Thev Yojna	3673000.00	48130000.00		66130000.00
8327678.00	10) Rashtramata Jijau Swabhiman Thev Yojana	7752726.00			
29370053.00	11) Vardhapandin Special Deposit	27118814.00	12268072.00	INTEREST RECEIVABLE	
	12) Jijau Thev Yojana	15268428.00		1) Interest Receivable	21631624.00
332166421.00		438400916.00	24773140.00		21631624.00
			24773140.00		
	LOANS & ADVANCES			OVERDUE INTEREST RECEIVABLE	
984846.17	1) Secured Cash Credit	643749.95	7467842.00	1) Interest Receivable on NPA	35849320.00
0.00	2) Secured Personal Loan	382681.60	948508.00		35849320.00
				LOANS & ADVANCES	
				1) Against Short Term Deposit	691011.00
				2) Against Double Benefit Deposit	623861.00

		AMOUNT	AMOUNT		AMOUNT

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती.

AMOUNT 31/03/2009	LIABILITIES	AMOUNT 31/03/2010	AMOUNT 31/03/2009	ASSETS	AMOUNT 31/03/2010
0.00	3) Cash Credit Ag. FDR	282811.00	1387026.00	3) Against Monthly Income Plan	2128727.00
984846.17		1309241.45	42244.00	4) Against Special Fixed Deposit	0.00
	BILLS		122233629.98	5) Secured Cash Credit	117486112.45
881591.00	1) Inward Bills Payable	736723.00	45426767.50	6) Secured Personal Loan	43231884.00
1721053.40	2) Outward Bills Payable	796520.00	27430287.90	7) Hypothication Installment Loan	31577465.90
2602644.40		1533243.00	117134366.00	8) House Mortgage	106253175.00
	INTEREST PAYABLE		923415.00	9) Unsecured Personal Sec. Loan	1823190.00
32605687.00	1) Interest Payable	46161080.00	34209865.00	10) Vehicle Loan	33441983.00
32605687.00		46161080.00	152323.00	11) Advance to Staff	116860.00
	OVERDUE INTEREST RESERVE		4312413.00	12) Against Government Securities	4049616.00
24692386.00	1) Overdue Interest Reserve	38849320.00	71663.00	13) Against Rajshree Shahu Shk. Yojna	0.00
24692386.00		38849320.00	88262.00	14) Against Daily Recurring Deposit	0.00
	PAYSLIPS PAYABLE		15613187.00	15) Agriculture Loan	14737058.00
840994.00	Pay Order	318247.00	0.00	16) Against Monthly Recourring Deposit	25515.00
840994.00		318247.00	3736389.00	17) Education Loan	3475279.00
	OTHER LIABILITIES		1481732.00	18) Gold Loan	2864459.00
473277.40	1) Misc. Deposits	820197.40	430432.00	19) Against VSD	549616.00
725477.00	2) Unpaid Demand Draft	1706829.00	0.00	20) Loan Against Property	27267739.00
505738.00	3) Bonus Payble	411434.00	0.00	21) Cash Credit AG. FDR	5666905.01
4560.00	4) Professional Tax	4545.00	0.00	22) Against JITY	12504.00
11216.00	5) T.D.S. Contractor	176.00	0.00	23) Against RJSTY	41190.00
15000.00	6) Provision For Education Fund	15000.00	383090151.38		402352950.36
0.00	7) Share Suspanse	38300.00			
333798.00	7) Audit Fee Payable	195570.00	881591.00	**BILLS**	
71143.00	9) Employees Provident Fund	29102.00	1721053.40	1) Inward Bills Receivable	736723.00
1249037.50	10) Dividend Payable 2004-05	0.00	2602644.40	2) Outward Bills Receivable	796520.00
					1533243.00

AMOUNT 31/03/2009	LIABILITIES	AMOUNT 31/03/2010	AMOUNT 31/03/2009	ASSETS	AMOUNT 31/03/2010
540873.00	11) Dividend Payable 2005-06	0.00		**OTHER DEPOSITS**	
623336.00	12) Dividend Payable 2006-07	0.00	1000000.00	1) Advance Income Tax	0.00
1996048.00	13) Divident Payable 2007-08	767480.00	923600.00	2) Deposit with divisional sport complex	923600.00
0.00	14) Divident Payable 2008-09	1014663.00	100000.00	3) With M.S.E.B.	100000.00
0.00	15) Provision for Pay Arries	200000.00	2023600.00		1023600.00
0.00	16) Nominal Member fees	9280.00		**STOCK & STORES**	
6551305.90		5212576.40	761865.00	1) Dead Stock & Furniture	1645652.00
	SUNDRIES		617554.00	2) Computer & Peripherals	637082.00
809318.00	1) Sundry Creditor A/c	1652679.00	89295.00	3) Office Equipment	144569.00
809318.00		1652679.00	205725.00	4) Stationary	246975.00
			1674439.00		2674278.00
	BANK GUARANTEE			**SUNDRIES**	
885000.00	1) BANK GUARANTEE	325000.00	0.00	1) Sundry Debtors	54278.00
885000.00		325000.00	0.00		54278.00
	PROFIT AND LOSS			**BANK GUARANTEE**	
4799700.00	1) Profit and Loss	6321517.34	885000.00	1) Bank Guarantee	325000.00
4799700.00		6321517.34	885000.00		325000.00
704318037.37	TOTAL LIABILITIES	843214281.62	704318037.37	TOTAL ASSETS	843214281.62

D. G. Satokar
Chief Executive Officer

Er. Rajendra S. Jadhao
VICE CHAIRMAN

Er. Avinash A. Kothale
CHAIRMAN

JIJAU COMMERCIAL CO-OPERATIVE BANK LTD., AMRAVATI

REGD. NO. ATI/ATI/BNK (O) 312/99

PROFIT & LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED ON 31.03.2010 (EXPENDITURE SIDE)

FORM "B"

Sr. No.	Particulars	AMOUNT 2008-09	AMOUNT	AMOUNT 2009-10	AMOUNT
1.	**A) INTEREST PAID ON DEPOSITS**				
	1. Double Benefit Deposit	2392132.00		2268983.00	
	2. Monthly Income Deposit	2649170.00		4234214.00	
	3. Short Term Deposit	15521687.00		20398151.63	
	4. Monthly Recurring Deposit	95933.00		87506.00	
	5. Daily Recurring Depost.	144384.00		203762.00	
	6. Saving Deposits.	4727933.00		5183130.00	
	7. Jijau Saving Link Deposit	254268.00		94337.00	
	8. Rajshree Shahu Shikshan Yojna	100634.00		153605.00	
	9. Special Fixed Depost	2672521.00		2183530.00	
	10. Sant Tukaram Artha Vrudhi Yojna	1681437.00		1709320.00	
	11. Sant Tukaram Smruti Thev Yojna	586568.00		812866.00	
	12. Intt. on Staff Security Deposite	13785.00		12700.00	
	13. Intt. On VSD	1494773.00		3006567.00	
	14. Intt. On RJSTY	90099.00		886069.00	
	15. Intt. on JTY	0.00		245698.00	
	16. Interest on TOD	83699.00		0.00	
			32509023.00		**41480438.63**
2.	**Intt. on Advances**				
	1. Intt. Received on D.R.D.	903.00		0.00	
			903.00		**0.00**

Sr. No.	Particulars	AMOUNT 2008-09	AMOUNT	AMOUNT 2009-10	AMOUNT
	5. Provision for Investment Fluctuation Fund	500000.00		1000000.00	
	6. Prov. For Amortised (Investment)	926648.00		500000.00	
	7. Audit Fees Payable	200000.00		32000.00	
	8. Provision for Staff Welfare Fund	639000.00		0.00	
	9. Provision for Social Welfare Fund	0.00		100000.00	
	10. Provision for Special BDDR	500000.00		1000000.00	
	11. Provision for Loan Contigent Fund	447075.00		1100000.00	
	12. Provision for Meeting Welfare Fund	650000.00		0.00	
	13. Prov. for Advance Income Tax			1600000.00	
	14. Prov. for Divident Cont. Fund			200000.00	
	15. Prov. for Death Relief Fund			200000.00	
	16. Provision for Pay Arries			500000.00	
	17. Death Welfare Fund	500000.00		0.00	
			17717195.42		20032000.00
24.	**TRAINING EXPS.**			82042.00	
	1. Employee Training Expenses	23863.00		71649.00	
	2. Director Training Expenses	11810.00			
			35673.00		153691.00
25.	**Int. Payable on Branch A/c.**			219861.00	
	Intt. Payable on Branch Account				219861.00
	NET PROFIT	**4799700.00**	**4799700.00**	**6321517.00**	**6321517.34**
	GRAND TOTAL	**62701848.82**	**62701848.82**	**77335795.30**	**77335795.30**

D. G. Satokar
Chief Executive Officer

Er. Rajendra S. Jadhao
VICE CHAIRMAN

Er. Avinash A. Kothale
CHAIRMAN

जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि., अमरावती.

JIJAU COMMERCIAL CO-OPERATIVE BANK LTD., AMRAVATI

REGD. NO. ATI/ATI/BNK (O) 312/99

PROFIT & LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED ON 31.03.2010 (INCOME SIDE)

FORM "B"

Sr. No.	Particulars	AMOUNT 2008-09	AMOUNT	AMOUNT 2009-10	AMOUNT
1.	A) INTEREST RECEIVED ON LOANS & ADVANCES				
	INTEREST RECEIVED ON DEMAND LOANS				
	1. Against Double Benefit Deposit	177215.00		89014.00	
	2. Against Short Term Deposit	709302.00		902385.00	
	3. Secured Cash Credit	14828290.00		17018396.33	
	4. Hypothication Installment Loan	1571738.00		2650331.00	
	5. Intt. received on House Mortgage	11084384.00		13476219.00	
	6. Intt. received on Vehicle Loan	3599288.25		3864199.00	
	7. Against Govt. Security	723905.00		546391.00	
	8. Unsecured Personal Loan	75772.00		162655.00	
	9. Secured Personal Loan	3568624.00		5682588.00	
	10. Against Rajshree Shahu Shik. Youjna	1514.00		0.00	
	11. Against Monthly Income Plan.	101558.00		169554.00	
	12. Against Recurring Deposit	17568.00		5760.00	
	13 Int. Received on Against Special Fixed Deposit	0.00		10000.00	
	14. Interest Received on Agricultural Loan	1491836.00		2084304.64	
	15. Interest On Other Loans	0.00		0.00	
	16. Interest Received on Gold Loan	132866.00		279448.00	
	17. Interest Received on Education Loan	267651.00		466092.00	
	18 Interest Received Ag. STAVY	721.00		0.00	
	19. Interest Received Ag. STATY	806.00		0.00	
	20. Intt. Bill Discounting	842.00		0.00	
	21. Intt. Against VSD	7964.00		88718.00	
	22. Intt. Rec. on RJSTY	1463.00		5730.00	